# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६१०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


परीपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/पदविका/सुनावणी/२०१५-१६/ ७२९
दिनांक : 25 FEB 2015

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता प्राप्त पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेश क्षमता वाढ ..., नवीन अभ्यासक्रम, सेकंड शिफ्टबाबतच्या प्रस्तावांच्या सुनावणीबाबत...

संदर्भ :- १. Advt. No. Approval/01(04)/2005, Dated 23.1.2015 and Corrigendum Advt. No. Approval/01/(05)/2015, Dated 29.1.2015.

२. या संचालनालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/मान्यता/२०१५/६५, दि. २.२.२०१५.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता मान्यता प्रक्रियेसाठी प्रसिध्द केलेल्या संदर्भ क्रमांक १ वरील सूचनेव्दारे ॲप्रुव्हल प्रोसेस २०१५-१६ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन-लाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले आहेत. त्या नुसार व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांसंदर्भात पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेश क्षमता वाढ/ , नवीन अभ्यासक्रम, सेकंड शिफ्ट इत्यादी बाबत परिषदेस केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरिता www.dtemaharashtra.gov.in/courseapproval2015 ही लिंक संदर्भ क्रमांक २ वरील परिपत्रकान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

विद्यमान पदविका स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबत शासनाने बृहत आराखडा (Perspective Plan) तयार केला असून सदर बृहत आराखडा संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तरी, परिषदेस पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेश क्षमता वाढ ..., नवीन अभ्यासक्रम, सेकंड शिफ्ट इ. बाबत अर्ज सादर करणाऱ्या संस्थांनी बृहत आराखडयामध्ये (Perspective Plan) शैक्षणिक वर्ष २०१५-६ करीता जिल्हानिहाय उपलब्ध प्रवेशक्षमता विचारात घ्यावी.

तसेच उपरोक्त विषयाबाबत या संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक २ पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांनी प्रवेश क्षमता वाढ, नवीन अभ्यासक्रम, सेकंड शिफ्ट इ. बाबतचे प्रस्ताव या संचालनालयास व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना दिनांक २७.२.२०१५ पर्यंत किंवा त्यापुढे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने वेळोवेळी अद्ययावत केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत ऑनलाईन सादर (Confirm) करावेत. ज्या संस्था संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि. २८.२.२०१५ किंवा त्यापुढे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने वेळोवेळी अद्ययावत केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत ऑनलाईन पध्दतीने माहिती भरुन भरलेल्या माहितीची निश्चिती (Confirm) करतील त्यापैकी शासकीय संस्था वगळून उर्वरित संस्थांची सुनावणी या संचालनालयाच्या समिती सभागृहात खालील प्रमाणे आयोजित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग निहाय क्रम. | सुनावणीचा दिनांक | सुनावणी वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | १. नागपूर<br>२. अमरावती,<br>३. मुंबई | ४.३.२०१५ | सकाळी १०.०० | तंत्रशिक्षण संचालनालय, सीईटी सेल सभागृह, मुख्य कार्यालय, मुंबई |
| २. | १. औरंगाबाद<br>२. नाशिक<br>३. पुणे | ५.३.२०१५ | सकाळी १०.०० | तंत्रशिक्षण संचालनालय, समिती सभागृह, मुख्य कार्यालय, मुंबई |

तरी संबंधीत संस्थांनी खालील नमूद आवश्यक कागदपत्रांसह सुनावणीकरिता संस्थेचे सचिव/अध्यक्ष/प्राचार्य यापैकी एक यांनी माहितगार व्यक्तीसह व्यक्तीशः या संचालनालयात उपस्थित रहावे ही बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त विषयाबाबत ऑनलाईन प्रस्ताव सादर केलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

१. संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयात नोंदणी शुल्क रक्कम भरल्याची पावती.
२. संस्थेमध्ये राबविण्यात येत असलेल्या / सुरु असलेल्या पदविका/ पदवी अभ्यासक्रमांना एनबीए (**National Board of Accreditation, New Delhi**) यांचेकडून प्राप्त अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निर्देशांनुसार वैध ॲक्रिडीटेशन प्रमाणपत्र.
३. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई / तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे प्राचार्य/शिक्षकीय पदांना मान्यतेबाबतचे पत्र/ संबंधीत कागदपत्र.
४. अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या कॅंपस प्लेसमेंट बाबतची माहिती.
५. मागील ३ वर्षाच्या प्रवेशाच्या रिक्त जागांबाबत तक्ता.
६. संस्थेमध्ये आयोजित करण्यात आलेल्या परिषदा आणि आयोजित कार्यशाळा यांची माहिती.
७. परिक्षेस बसलेले विद्यार्थी व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती.
८. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचा त्रुटी अहवाल (**Deficiency Report**)/ त्रुटी पुर्तता अहवाल(**Compliance Report**).
९. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या अर्जाची प्रत व कागदपत्र.(अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत)
   अ. भाग-१ (**Part I**).
   ब. भाग-२ (**Part II**).
१०. संस्थेच्या प्राचार्यांनी साक्षांकित केलेले **प्रपत्र क व प्रपत्र ड (Annexure C & D)**.
११. नोंदणीकृत आर्किटेक्ट यांनी प्रमाणित केलेले **प्रपत्र इ (Annexure E)**.
१२. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचा मागील शैक्षणिक वर्षाचा सम सत्रातील ॲकेडमीक मॉनेटरींग रिपोर्ट.
१३. प्रस्तावित नवीन अभ्यासक्रम/ प्रवेशक्षमता वाढ याअनुषंगाने संस्थेकडे असलेल्या आर्थिक तरतुदीबाबत कागदपत्र (बँकचे विवरणपत्र, मुदतठेवी, बचत खाते इ.)
१४. कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनाबाबत बँकेचे विवरणपत्र.
१५. तसेच प्रस्तावात नमूद माहितीच्या अनुषंगाने संबंधीत इतर कागदपत्रे.

तसेच पुढे असेही नमूद करण्यात येते की, या संचालनालयामार्फत आयोजित करण्यात आलेल्या सुनावणीस संस्था अनुपस्थित राहील्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील, याची नोंद घ्यावी.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या सर्व व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.
२. कार्यासन क्रमांक ३ (आयटीसेल), मुख्य कार्यालय, मुंबई यांना या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी तसेच त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सुनावणीसाठी समिती सभागृहात १ संगणक, १ प्रिंटर इंटरनेट कनेक्शन सुविधेसह उपलब्ध करुन देण्यात यावा.
३. कार्यासन क्रमांक १२ (आस्थापना), मुख्य कार्यालय, मुंबई त्यांना कळविण्यात येते की, दिनांक ४.३.२०१५ ते दिनांक ५.३.२०१५ पर्यंत संचालनालयाचे सीईटी सेल सभागृह व समिती सभागृह पदविका अभ्यासक्रमांच्या सुनावणीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावे.
४. निवडनस्ती

प्र.क्र. विकाअ/ प्रशिला/पदविका/ सुनावणी/२०१५/८६९
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
दिनांक :- २६/२/२०१५

प्रत:- प्राचार्य, सर्व पदविका संस्था, यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये नमुद माहितीप्रमाणे कार्यवाही व्हावी.

S. D. Pasebar
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती

प्रतिलिपी:- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.